पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/ ४/ कावि/२५६/२०१०
दिनांक- ०८ / ०९ /२०१०

प्रति,
मा.......................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. महापालिका सभा दिनांक २०/०९/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

माननिय महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१० ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०९/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

## सूचना

[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए)(एच)(आय) अन्वये. ]

## कार्यपत्रिका क्रमांक- ५१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर- २०१० ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०.०९.२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

मा.महापालिका सभा क्र-५० दि.२०/८/२०१० (दु.२.०० व ३.००) चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

## प्रश्नोत्तरे

[ मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये ]

----------

## मा. स्थायी समितीचे ठराव

विषय क्रमांक १) संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.लेखा/३/कावि/ १४२/२०१० दि.१२/५/२०१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११२२७ दि.८.०६.२०१०

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९७१ दि.२०.८.२०१० अन्वये.

महाराष्ट्र शासन निर्णयान्वये पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. या दोन्ही संस्था एकत्र होऊन पी.एम.पी.एम.एल. या नावाने नवीन संस्था स्थापन झाली असुन शासन निर्णयानुसार मागील तीन वित्तीय वर्षात पीएमटी व पी.सी.एम.टी. दोन्ही महापालिकांनी खर्च भागविणे साठी जे अनुदान दिले असेल त्याची सरासरी काढून सरासरी एवढे अनुदान संबंधीत महापालिका कंपनीकडे वर्ग करेल असे कळविले नुसार या मनपाने रक्कम अदा केलेली असून सदर तीन वर्षे कालावधीची मुदत दि.३१ मार्च, २०१० रोजी पुर्ण झाली असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मुदत पुर्ण झाल्याने परिवहन विभागास उचल या लेखाशिर्षावर कोणतीही तरतूद केलेली नसून तसे पी.एम.पी.एम.एल. यांना कळविण्यात देखील आलेले असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी एप्रिल २०१० चे वेतन अदा करणेसाठी र.रू.१ कोटी २७ लाख मिळणेकामी विनंती केली असल्याने वरील बाबी विचारात घेता पी.एम.पी.एम.एल.

यांना रक्कम अदायगीबाबत निर्णय घेणेत यावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याकामी पुर्व पिसीएमटीच्या कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे किंवा पिसीएमटीचे पीएमपीएमएल या कंपनी मधील शेअरप्रमाणे (हिश्याप्रमाणे) या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप :- माहे सप्टेंबर- २०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक २) संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.भुजिं/२/कावि/१४५/२०१०दि.१६/७/२०१०
२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११४९० दि.२७.७.२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.९७५ दि.२०.८.२०१० अन्वये.

से.नं.२८, संत ज्ञानेश्वर महाराज व्यापारी संकुल मधील रिक्त गाळा क्र.७ श्रीम.सविता प्रविण थोरात यांना [क्षेत्र चौ.मी. २८ + (पोटमाळा ८.२९) सह / २५ वर्षाचे मनपा दर मनपा / शासन करा व्यतिरिक्त र.रू.८,६०,४३७/- / २५ वर्षाचे बंद पाकीट दर मनपा / शासन कराव्यतिरिक्त र.रू.८,६२,०००/-] व गाळा क्र.१० श्रीम.शालिनी हंदुराव थोरात यांना [क्षेत्र चौ.मी.३५ + (पोटमाळा ८.२९) सह / २५ वर्षाचे मनपा दर मनपा / शासन कराव्यतिरिक्त र.रू.१०,४३,८३७/- / २५ वर्षाचे बंद पाकीट दर मनपा/शासन कराव्यतिरिक्त र.रू.१०,४५,०००/-] २५ वर्षाच्या लिजने निविदा अटी शर्तीनुसार देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप :- माहे सप्टेंबर- २०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक ३) संदर्भ- १) मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ४/८/२०१० ठराव क्र.१२
३) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११६१८ दि.१३.८.२०१०

मनपा परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडुंना प्रोत्साहन मिळुन मनपा परिसरातील जास्तीत जास्त राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडु तयार होण्याच्या दृष्टीने मनपाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या क्रीडा शिष्यवृत्ती रकमेत वाढ करणे आवश्यक असल्याने सन २००९ - १० वर्षापासून महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेतर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.१८००/- ऐवजी र.रु.३०००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.१८००/- ऐवजी र.रु.३०००/- राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धा (नॅशनल स्कुल गेम/स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.३०००/- ऐवजी र.रु. ५०००/- या प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक :- ४) संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/१९३६/२०१०

दि. ११/८/२०१०

२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११६५७ दि.२५.८.२०१०

रूग्णालयीन वैद्यकीय सेवेचे पुर्णांकित करावयाचे दर व नव्याने आकारणी करावयाचे दर निश्चितीचे प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ व पिं.चिं.म.न.पा. हद्दीबाहेरील आंतररूग्णांकडून २० % जादा बिल आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक :- ५) संदर्भ :- १) मा.मनोहर पवार,मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव -
२) मा. स्थायी समिती सभा ठ.क्र.११८२२ दि.१.९.२०१०

महापौर चषक महाराष्ट्र केसरी विकी बनकर यांस र.रु. २,५१,०००/- आर्थिक सहाय्य महापालिकेतर्फे देणेस मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

------

<u>मा. शिक्षण मंडळाकडून आलेली पत्रे</u>

विषय क्रमांक :- ६) संदर्भ :- १) क्र.शिमं/अस्था/कावि/२८०/२०१० दि.२७/०४/२०१०
२) मा. शिक्षणमंडळाकडील ठ.क्र.६२८ दि.११/६/२०१०

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२. यांचेकडील आदेश क्रमांक-एसएओ ३१०८/प्र.क्र.१८/(२)/प्रशा-२. दिनांक १५ मे,२००८ अन्वये श्री.एच.बी.भारती प्राध्यापक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांची प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर शासनाच्या अटी व शर्तीस अधीन राहून प्रथमत: २ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.एच.बी.भारती प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांना मा.शिक्षण मंडळ सभा ठराव क्रमांक १८८ दिनांक ०७/०६/२००८ अन्वये २ वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मंजूरी देण्यात येवुन सदरचा ठराव मा.मनपा सभेकडे मान्यतेसाठी पाठविला असता, मा.मनपा सभेने ठराव क्रमांक ४४३ दि. १९/०९/२००८ अन्वये प्रथम १ वर्षासाठी आणि त्यानंतर ठराव क्रमांक ७७३ दि. २१/१२/२००९ अन्वये पुढील १ वर्षासाठी याप्रमाणे एकूण २ वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मंजूरी दिली आहे.

श्री.एच.बी.भारती महानगरपालिकेच्या प्रशासन अधिकारी पदावर दि. २१/०५/२००८ रोजी रुजू झाले असून त्यांची वरील ठरावानुसार २ वर्षाची मुदत दि. २०/०५/२०१० रोजी संपुष्टात येत असल्याने व शिक्षण मंडळ कार्यालयास श्री.एच.बी. भारती यांची आवश्यकता असल्यामुळे त्यांना पुढील १ वर्षासाठी मुदत वाढ देणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मा.शिक्षण मंडळ सभेपुढे विचारार्थी ठेवण्यात आला होता. त्यावर सभेत सांगोपांग चर्चा होवुन

श्री.एच.बी.भारती, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांना पुढील १ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येवून सर्वानुमते विषय मंजुर करण्यात आला. विषय कायम होण्याची वाट न पाहता मा.महापालिका सभेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा.

-------

मा.विशेष समित्यांचे वृत्तांत

मा.महिला व बालकल्याण समिती

विषय क्रमांक ७) दि.१४/७/२०१० , १७/७/२०१० व २/८/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

-------

मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

विषय क्रमांक ८) दि. ४/८/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

------

मा.क्रिडा समिती

विषय क्रमांक ९) दि. ४/८/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

------

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/ ४ /कावि/ २५६ / २०१०
दिनांक :- ०८ / ०९ /२०१०

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे [ डॉकेट्स ]
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.